# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - इतिहास

पुणे हे देशातील सर्वात अधिक वेगाने वाढणारे कॉस्मोपोलिटन शहर आहे. अनेक मोठ्या कालावधीपासून फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्युट ऑफ इंडिया (एफ.टी.आय.आय) ही संस्था येथे असल्यामुळे चित्रपट चाहत्यांचा एक विशिष्ट प्रेक्षकवर्ग शहरात निर्माण झालेला आहे. पुण्यावर परदेशी विद्यार्थी, व्यावसायिक तसेच तत्वज्ञ-शास्त्रज्ञांचा प्रभाव आहे. विविध भागांमधून हे सर्व पुण्यामध्ये आलेले आहेत. तसेच येथील समाजाचा एक महत्वाचा भाग बनलेले आहेत. पुणे हे भारताची शैक्षणिक राजधानी म्हणूनही ओळखली जाते. यामुळे देशातील कानाकोपऱ्यातून विद्यार्थ्यांचा लोंढा या शहराकडे येत असतो. 'दि. नॅशनल फिल्म अर्काइव्ह ऑफ इंडिया' ही संस्था सुद्धा पुण्यामध्ये आहे.

शहरामध्ये असलेल्या मल्टिप्लेक्स चित्रपटगृहांमुळे जागतिक पातळीवरील चित्रपट पाहणे सुद्धा येथील लोकांना सहजशक्य होत आहे. यामुळेच चित्रपटांविषयीचा एक वेगळा उत्साह व वेड येथे जोपासले गेल्याचे जाणवते. पुण्यात असलेले वेगवेगळ्या संस्कृतीचे लोक व त्यांच्या विविध आवडी - निवडी यामुळे येथे अनेक संस्कृतींचा सुंदर मिलाप आढळून येतो. यामुळेच 'इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल'साठी एक आदर्श व्यासपीठ येथे मिळून गेले.

या सर्व गोष्टी लक्षात घेऊन व पुण्यातील मोठा प्रेक्षकवर्ग डोळ्यासमोर ठेवूनच 'पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल चे २००२ मध्ये प्रथम आयोजन करण्यात आले व ते यशस्वी देखील ठरले. आज हा फेस्टिवल एक मोठा वार्षिक समारंभ बनून राहिलेला आहे.

- या फेस्टिवलचा थोडक्यात इतिहास आम्ही येथे देत आहोत.

## पी. आय.एफ.एफ. २००२

पहिला पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल प्रचंड यशस्वी ठरला. सुमारे १८०० प्रतिनिधींनी यामध्ये सहभाग घेतला. जवळजवळ आठ देशांमधील ५० चित्रपटांचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. ख्यातनाम दिग्दर्शक मृणाल सेन व अभिनयाचे बादशहा दिलीपकुमार यांना 'लाईफ टाईम अचिव्हमेंट अॅवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले.

उद्‌घाटनाचे चित्रपट हे मुख्य आकर्षण ठरले. यामध्ये 'ग्रिफ पॉईंट' (जर्मन) - (सिल्व्हर बिअर अँड स्पेशल ज्युरी अॅवॉर्ड बर्लिनेल - २००२) हा आंद्रे ड्रेसेन दिग्दर्शित तसेच टेकिंग साईडस् (हंगेरिअन), रेन 'द सन्स रूम' आदि चित्रपटांचा समावेश होता.

## पी. आय.एफ.एफ. २००३

पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल २००३ मध्ये जवळजवळ १० देशांमधील एकूण ८० चित्रपटांचे सादरीकरण करण्यात आले. 'नो मॅन्स लॅन्ड' हा ऑस्कर पुरस्कार विजेता चित्रपट उद्घाटन प्रसंगी दाखविण्यात आला. तसेच ए.आर. रहेमान यांनी संगीत संयोजन केलेला 'वॅरिअर्स ऑफ दि हेवन अॅन्ड अर्थ ' हा जपानी शास्त्रीय संगीतावर आधारित चित्रपटाने महोत्सव संपन्न झाला.

या दुसऱ्या पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल मध्ये लाईफ टाईम अचिव्हमेंट अॅवॉर्ड गानसम्राज्ञी लता मंगेशकर व चिरतरूण अभिनेते देवआनंद यांना देण्यात आले.

## पी. आय.एफ.एफ. २००५

२००५ मध्ये पी. आय.एफ.एफ. चे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. यावेळी जवळजवळ १४ देशांमधून ९५ चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल मा. एस.एम.कृष्णा, फ्रान्सचे राजदूत मा. डॉमनिक गिरार्ड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ सिनेअभिनेत्री वहिदा रहेमान व ज्येष्ठ दिग्दर्शक शक्ती सामंत यांना लाईफ टाईम अचिव्हमेंट अॅवॉर्ड केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री श्री. जयपाल रेड्डी यांच्याहस्ते देण्यात आला.

ऑस्कर पुरस्कारासाठी नामांकन झालेले साऊथ आफ्रिकेचा 'यस्टरडे' अफगाणिस्तानचा - अर्थ अँड अशेश व भारतीय चित्रपट श्वास आदि चित्रपटही यावेळी दाखविण्यात आले. यापैकी सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा पुरस्कार 'यस्टरडे' या चित्रपटाला देण्यात आला व सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार जोस्युल मेन्डेझ यांना 'दिअॅस दे सॅन्टिअॅगो' या चित्रपटासाठी देण्यात आला.

आंतरराष्ट्रीय ज्युरीमध्ये पुढील मान्यवरांचा समावेश होता.

- ज्युरीचे अध्यक्ष श्री. मिल्टन शेफ्टर (अमेरिका)
- ज्युरीचे प्रतिनिधी श्री. रेन्सेस मॉरझॉक (चित्रपटांचे तंत्रज्ञ - इजिप्त), इस्त्राइलचे दिग्दर्शक डॅन वोल्मन, इराण दिग्दर्शिका - श्रीमती पौरान डेरॉक्सान्दे इत्यादी.
- **आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक :-** (ज्यांचे चित्रपट प्रदर्शित झाले) लॉरेन्स डेव्हिड फील्डस् (युएसए) - दिग्दर्शक - फाईंडींग होम . मार्क मिली (फिलीपाइन्स) - दिग्दर्शक - क्राइंग लेडिज. डेनिस बोविन - दिग्दर्शक - होल्ड ऑन टू युवर हॅट
- **कलाकार :-** निदा बाकिम (लिस्बन) - चित्रपट - रिंग ऑफ फायर, जोएल न्युन्झ (युएसए) - चित्रपट - फाइनली द सी
- **निर्माते :-** व्हिक्टोरिया पेंगे मेयेरिंक (युएसए) - चित्रपट - फाईंडिंग होम

**<u>पी. आय.एफ.एफ. २००५ चे महत्वाचे मुद्दे</u>**

- स्पर्धात्मक विभाग - जागतिक चित्रपट
- मॅरलॉन ब्रॅन्डो व महमूद - ट्रिब्युट
- कन्ट्री फोकस - फ्रान्स
- जेनर - थ्रिलर सिनेमा
- रेट्रोस्पेक्टिव - गुरूदत्त, हिचकॉक
- शेक्सपिअर - इन सिनेमा
- युवा दिग्दर्शक - फ्रेंच चित्रपट
- भारतीय पडसाद
- वर्कशॉप - स्वतंत्र दिग्दर्शक आणि अमेरिकेतील चित्रपट निर्मिती

या महोत्सवाने सुनामी ग्रस्तांना मदत निधी अर्पण केला यावेळी 'किस्ना' हा चित्रपट मदतनिधीसाठी दाखविण्यात आला.